रामप्रहर शनिवार, १६ फेब्रुवारी २०१९

# उड्डाण महोत्सवात उरण महाविद्यालय प्रथम

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातर्फे घेण्यात आलेल्या उड्डाण महोत्सवात बाजी मारली आहे. या महाविद्यालयाने पथनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

मुंबईच्या सायन येथील गुरुनानक महाविद्यालयात झालेल्या पथनाट्य स्पर्धेत एकूण २२ महाविद्यालयांतील ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता, तसेच ३५ विस्तारकार्य शिक्षक सहभागी होते. या स्पर्धेत कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयाने 'यात माझी काय चूक' या महिलांच्या मासिक पाळीबद्दल समज व गैरसमज विषयावर पथनाट्य सादर केले. यात प्रीतम घोष, भूमिका म्हात्रे, तेजश्री मोरे, सर्वांगी म्हात्रे, लतिका जोशी, श्वेता मसूरकर, भक्ती तेलंग, प्रतीक्षा जोशी, आवृत्ती पालकर, पौर्णिमा बुरुड, आरती खरोल व गौरव सरफरे हे विद्यार्थी सहभागी होते. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## क्षेत्र भेट कार्यक्रमास प्रतिसाद

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा क्षेत्र भेट कार्यक्रम नुकताच झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. बाळासाहेब पाटील होते. विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सकारात्मक जीवन कसे जगावे व जीवनातील ताण कसा कमी करावा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांनी विद्यार्थीजीवनातच व्यक्तित्व विकास करून जीवनातील आव्हाने स्वीकारण्यास सक्षम बनावे, असे सांगितले.

या कार्यक्रमानिमित्त महिलांच्या मासिक पाळीबद्दल समज व गैरसमज या विषयावरील पथनाट्य सादर करून मासिक पाळीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे कसा आवश्यक आहे, हा संदेश देण्यात आला. या वेळी संजय पन्ना, शिवानी जगताप, खान सदा व शिफा शेख या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर संशोधन पेपर सादर केले. प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमास प्रा. एच. के. जगताप, प्रा. डॉ. पराग करुळकर, प्रा. आनंद गायकवाड, प्रा. डॉ. अरुण चव्हाण, प्रा. रामकृष्ण ठवरे, प्रा. अनुपमा कांबळे, प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे, तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

दै. रामप्रहर दि. 05/02/2019

# उरण महाविद्यालयाचा पदवीप्रदान सोहळा



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ साजरा झाला. या कार्यक्रमामध्ये एम.कॉम., बी.कॉम., बी.ए. व अकाऊंटिंग ॲन्ड फायनान्सच्या पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आल्या.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जीटीपीएस अभियंता प्रशांत नागदेव, प्राचार्य के. एस. शामा महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रमेश ठाकूर, पी. डी. पाटील व नवीन राजपाल, प्रा. व्ही. एस. इंदुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुण्यांनी करियरच्या संधी, एमपीएससी, यूपीएससी आदीविषयी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रायार्य के. ए. शामा यांनी पदवीप्राप्त झाल्यानंतर शिक्षण न थांबविता पुढील शिक्षण घ्यावे व वेगवेगळे कौशल्य आत्मसात करावीत याविषयी मार्गदर्शन केले. एकूण २४० पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या.

शुक्रवार, १ फेब्रुवारी २०१९ ◆ वर्ष ११ ◆ अंक १९५

राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड



# कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाने संस्काररूपी विद्यार्थी घडविले

## सिडको अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रशंसोद्गार

**जेएनपीटी : प्रतिनिधी**

प्राचार्य के. ए. शामा सर यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाने संस्काररूपी विद्यार्थी घडविण्याचे महान कार्य केले आहे, असे गौरवोद्गार सिडकोचे अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी उरण येथे बोलताना व्यक्त केले.

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन गुरुवारी (३१ जानेवारी) उरण शहरातील १३ पंथीय हॉलमध्ये करण्यात आले होते. या वेळी शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सिडकोचे अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

जेएनपीटीचे विश्वस्त महेश बालदी, नगराध्यक्षा सायली म्हात्रे, प्रदीपचंद्रा श्रुंगारपुरे, रविशेठ भोईर, रमेश ठाकूर, नगरसेवक राजेश ठाकूर, पी. डी. पाटील, नवीन राजपाल, व्ही. एस. इंदुरकर उपस्थित होते. प्राचार्य के. ए. शामा यांनी प्रास्ताविक केले.

“

आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या उन्नतीसाठी व तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मेक इन इंडियाचा नारा दिला आणि त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे काम केले आहे. या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना टिकून राहायचे असेल व पुढे जायचे असेल, तर प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासाची कास धरणे गरजेचे आहे.

–आमदार प्रशांत ठाकूर

“

अपयश ही यशाची पहिली पायरी असते. त्यामुळे या विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले नाही. त्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुन्हा अभ्यासाची कास धरणे गरजेचे आहे, तसेच विद्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात आपला सहभाग घेऊन आपल्या पदरी यश कसे पडेल याचा आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.

–महेश बालदी (विश्वस्त, जेएनपीटी)

४ रामप्रहर मंगळवार, ११ सप्टेंबर २०१८

# उरण महाविद्यालयात महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती



उरण : रामप्रहर वृत्त–

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी महिलांच्या आरोग्यविषयी जनजागृती या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य के. ए. शामा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास नपा आरोग्य विभागाच्या सभापती यास्मीन गॅस, नगरसेविका जान्हवी पंडित व अॅड. माधवी पाटील उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा प्रा. ए. आर. कांबळे यांनी केले, तसेच प्रा. हन्नत शेख यांनी पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले.

या वेळी प्राचार्य शामा सर यांनी मुलींमध्ये होणारे वेगवेगळे आजार, त्या आजारापासून कसे संरक्षण करावे, याबद्दल मुलींना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमामध्ये प्रा. श्वेता गुप्ता यांनी ऑस्टियोपोरोसिस (हाडांची झीज) या आजारांची लक्षणे, कारणे व उपाय युनिनरी टेक इन्फेक्शन (मूत्रमार्गातील संसर्ग) यावर देखील त्यांनी मार्गदर्शन केले. प्रा. हन्नत शेख यांनी मुलींमधील थायरॉईडचे वाढते प्रमाण व त्यामुळे त्यांच्या शरीरावर होणारे परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आजची पिढी कशाप्रकारे तणावाखाली आहे. तणावांची कारणे व त्यातून कसे बाहेर पडावे याबद्दलही त्यांनी विद्यार्थ्यांनींना माहिती दिली.

प्रा. लिप्टन कुमारी यांनी मुलींमध्ये अॅनिमियाचे वाढते प्रमाण, अॅनिमियाची लक्षणे, कारणे, उपाय व अॅनिमिया झाल्यावर मुलींनी कशी काळजी घ्यावी? याबद्दल मार्गदर्शन केले. नंतर प्रा. स्मिता कोळी मॅडम यांनी तंत्रज्ञानाविषयी मुलींना मार्गदर्शन केले.प्रा. हन्नत शेख यांनी आभार मानले.

# उरण महाविद्यालयामध्ये महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती कार्यक्रम

उरण, १० सप्टें.(वार्ताहर): कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजी विद्यार्थ्यांनीसाठी महिलांच्या आरोग्यविषयी जनजागृती या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्राचे अध्यक्ष प्राचार्य श्री. के.ए. शामा सर होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या उरण नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाच्या सभापती श्रीम. यास्मीन गॅस, नगरसेविका श्रीम. जान्हवी पंडीत व अॅड. माधवी पाटील उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा प्रा. श्रीम. ए. आर. कांबळे यांनी केले. तसेच, प्रा. हन्नत शेख यांनी पाहुण्यांचा परिचय व स्वागत केले.

याप्रसंगी प्राचार्य शामा सर यांनी मुलींमध्ये होणारे वेगवेगळे आजार त्या आजारापासून संरक्षण कसे करावे, याबद्दल मुलींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये प्रा. श्रीम. श्वेता गुप्ता यांनी ''ऑस्टियोपोरोसिस'' (हाडांची झीज) या आजारांची लक्षणे, कारणे व उपाय ''युरिनरी टेक इन्फेक्शन'' (मुत्रमार्गातील संसर्ग) यावर देखील त्यांनी मार्गदर्शन केले. प्रा. कु. हन्नत शेख यांनी मुलींमधील थायरॉईडचे वाढते प्रमाण व त्यामुळे त्यांच्या शरीरावर होणारे परिणाम याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आजची पिढी कशाप्रकारे तणावाखाली आहे, तणावांची कारणे व त्यातून कसे बाहेर पडावे याबद्दलही त्यांनी विद्यार्थिनींना माहिती दिली.

प्रा. कु. लिप्टन कुमारी यांनी मुलींमध्ये अॅनिमियाचे वाढते प्रमाण, अॅनिमियाची लक्षणे, कारणे, उपाय व अॅनिमिया झाल्यावर मुलींनी कशी काळजी घ्यावी, याबद्दल मार्गदर्शन केले. नंतर प्रा. स्मिता कोळी मॅडम यांनी In Vitro Fertilization (IVF) तंत्रज्ञान याविषयी मुलींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व महिला विकास कक्षाच्या सदस्या उपस्थित होत्या. प्रा. हन्नत शेख यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता केली.

दै. वादळवारा 11/9/18

वर्ष २६ वे । अंक ६७ । पृष्ठ ६ । गुरुवार, दि. ३ जानेवारी, २०१९ । किंमत २ रुपये

दै. वादळवारा

# कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयाचे आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये यश

उरण, २ जानें. (वार्ताहर): कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या कु.हन्नत युसुफ शेख या विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये पदव्युत्तर गटातून द्वितीय क्रमांक पटकविला. सदर विद्यार्थीनीने "A Study on Women Empowerment form islamic Perspective; the Hidden Truth" या विषयावर आपला संशोधन प्रकल्प सादर केला.

या संशोधन प्रकल्पासाठी कु.हन्नत युसुफ शेख या विद्यार्थिनीला महाविद्यालयाचे प्राचार्य के.ए.शामा तसेच प्रा.व्ही. एस.इंदुलकर(वाणिज्य विभाग प्रमुख).प्रा.डॉ.पी.आर.कारूळकर, प्रा.डॉ.ए.आर.चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालय विकाससमिती, प्राचार्य, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी तिचे अभिनंदन करण्यात आले व राज्यस्तरावर सहभागी होण्याकरिता शुभेच्छा दिल्या.